दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ३२ शनिवार दि.०२ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## माणिकराव कोकाटेंबाबत फडणवीसांना श्रेय मिळू नये म्हणून अजित पवारांची मोठी खेळी



विधान भवनात ऑनलाइन रम्मी खेळताना आढळलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कृतीने शेतकऱ्यांमध्ये आणि विरोधकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला होता. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) नेते रोहित पवार यांनी हा व्हिडिओ व्हायरल करत कोकाटे यांच्या बेजबाबदार वर्तनावर बोट ठेवले होते. यानंतर विरोधकांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. अखेर सरकारने कोकाटे यांच्याकडून कृषिमंत्रिपद काढून घेत त्यांना क्रीडा आणि युवक कल्याण खाते सोपवले, तर अजित पवारांचे विश्वासू सहकारी दत्तात्रय भरणे यांना नवे कृषिमंत्री बनवण्यात आले आहे. दरम्यान, माणिकराव कोकाटेंच्या विधानावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे देवेंद्र फडणवीस माणिकराव कोकाटेंचा राजीनामा घेणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. फडणवीसांना श्रेय मिळू नये म्हणून अजित पवारांची मोठी खेळी मात्र, माणिकराव कोकाटेंबाबत देवेंद्र फडणवीसांना श्रेय मिळू नये म्हणून अजित पवारांनी स्वत:च त्यांची उचलबांगडी केली आहे. तसेच धनंजय मुंडेंच्या मंत्रिपदाचा राजीनामा देवेंद्र फडणवीसांनी परस्पर घेतल्याचे चित्र निर्माण झाले होते. त्यामुळे अजित पवारांनी माणिकराव कोकाटेंचं खातं बदललं ती चूक टाळल्याची राजकीय वर्तुळात चर्चा जोर धरू लागली आहे. कृषिमंत्रिपद दत्तात्रय भरणेंसाठी लॉटरी क्रीडा आणि युवक खातं मिळाल्याने अजित पवारांचे विश्वासू असलेलेल दत्तात्रय भरणे हे नाराज असल्याची चर्चा होती. दत्तात्रय भरणेंनी खातेवाटपानंतर ही नाराजी उघडही केली होती. मात्र, आता कोकाटेंवरील कारवाई ही दत्तात्रय भरणेंसाठी एक लॉटरी ठरली आहे. कृषिखात्यासारख्या महत्त्वाच्या खात्यावरील वर्णी ही दत्तात्रय भरणेंसाठी लॉटरीच मानली जात आहे. एकीकडे माणिकराव कोकाटेंचा खातेपालट करत अजित पवारांनी कारवाई केल्याचं दाखवलं. तर दुसरीकडे विश्वासू दत्ता भरणेंना कृषिखातं देत त्यांच्या नाराजीवरही अक्सीर इलाज केल्याचं बोललं जात आहे.

## अण्णाभाऊंचे साहित्य परिवर्तनाला दिशा व चालना देणारे...!

### -डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांचे प्रतिपादन



अहमदपूर / प्रतिनिधी :- साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे वंचीत, उपेक्षीत घटकांच्या परिवर्तनाला दिशा व चालना देणारे असून महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि परिवर्तनाच्या लढ्यात या साहित्याचे योगदान अतुलनीय असून अण्णाभाऊ साठे यांनी दलित साहित्याचा आरंभ अतिशय सशक्तपणे केला असल्याचे प्रतिपादन युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले. शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेये गोपीनाथराव जोंधळे होते. तर तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे माजी सभापती बालाजीराव गूट्टे,विद्रोही कवी राजेंद्र कांबळे,अण्णाराव सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते शेख रहीमभाई(शेखूभाई) शेषेराव ससाणे,भगवानराव ससाणे,बजरंग गायकवाड, रामानंद मूंडे,राहूल तलवार, मनिष क्षिरसागर,भीमराव कांबळे, शिवाजीराव गायकवाड,गणेश मूंडे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक नेते तथा सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार यांनी केले.पुढे बोलताना ते म्हणाले की,इथलाया प्रस्थापित व्यवस्थेने महापुरुषांना जातीच्या चौकटीत बसवून त्यांचे मोठेपण कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ जनमानसात रुजवण्याचे अतुलनीय काम केले असून शाहिरीच्या माध्यमातून येथील नागरीकांचे आत्मभान जागे करण्याचे काम केले आहे.पहिल्या दलीत साहित्य संम्मेलनात 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलीत कामगारांच्या हातावर तरली आहे असे प्रतिपादन करून जागतिक संरचनामध्ये दलित आणि कामगार वर्गाचे महत्त्व जगाला दाखवून दिले. महापुरुषांच्या जयंती करत असताना जयंतीला केवळ उत्सवाचे स्वरूप येऊ न देता जयंती ह्या प्रबोधनाचे माध्यम ठरावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष गायकवाड यांनी केले तर आभार मनोहर गायकवाड यांनी मानले. या प्रसंगी विद्रोही कवी राजेंद्र कांबळे,अण्णाराव सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर या कार्यक्रमाचा समारोप झाला. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन बानाटे, विठ्ठल गायकवाड,शिंदे शिवाजी,खंडू कांबळे, एकनाथ गायकवाड, अशोक गायकवाड,शिवाजी कांबळे, मारोती गायकवाड,भीमराव कांबळे,सरपंच शिवाजी तरूडे, श्याम कांबळे,चंद्रकात पौळ, आकाश पवार,शेख नजीरभाई,शेख हमीद,शेख मून्ना,शेख गौस आदींनी पुढाकार घेतला.

## दैनिक महावृत्तचे पत्रकार लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने तात्या गवळी सन्मानित



केज/प्रतिनिधी -आपल्या लेखनातून सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी दैनिक महावृत्तचे पत्रकार तात्या गवळी कायम तत्पर असणारे चळवळीत सक्रिय राहुन आंबेडकर चळवळीतील बुलंद तोफ अल्पावधीतच लोकप्रिय होऊन सर्वांसाठी आपलेसे वाटणारे ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै. प्रमोद लांडगे युवा मंच च्या वतीने २०२५ च्या लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने पत्रकार तात्या गवळी यांना सन्मानित करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, पत्रकारिता, क्रीडा क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये उलखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना कै. प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने पुरस्कार देण्यात येत आहे. पत्रकारीतेच्या व सामाजिक कार्यातून सतत अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध लेखणीच्या माध्यमातून उपेक्षितांना न्याय मिळवून देत आहेत. पत्रकार तात्या गवळी हे त्यांच्या निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अन्याला वाचा फोडून गोरगरिबांना सतत न्याय देण्याचे काम करत आहेत त्यांच्या कार्याची दखल घेत कै. प्रमोद लांडगे विचार मंचच्या वतीने पत्रकार तात्या गवळी यांना २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.यावेळी पुरस्कार सत्कारमूर्ती पत्रकार तात्या गवळी,कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते राजूभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, युवा नेते लखन भैय्या हजारे, वंचितचे प्रवीण मस्के, जनविकास फाउंडेशनचे सचिव विजय लांडगे, दैनिक बीड युवामंतचे संपादक अशोक नागरगोजे , वादळ महाराष्ट्र चे संपादक मुबाशीर खतीब, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकीत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी पुरस्काराला उत्तर देताना पत्रकार तात्या गवळी म्हणाले की, हा पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणा देणारा आहे या पुरस्काराची प्रेरणा घेऊन मी पत्रकारितेत व सामाजिक कार्यात अग्रेसर राहून अन्याला वाचा फोडून गोरगरिबांना न्याय देण्याचे प्रमाणिक काम करेल. पुढे बोलताना गवळी म्हणाले की, या पुरस्काराच्या माध्यमातून समाज बांधवांनी माझ्या खांद्यावरती जबाबदारी दिली आहे ती जबाबदारी प्रामाणिकपणे संभाळण्याचे काम करेल. यावेळी भीम नगर, सिद्धार्थ नगर भागातील युवक- युवती, महिला, नागरिक व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लखन हजारे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक व उपस्थित त्यांच्या आभार रोहित कसबे यांनी मानले.






## महापुरुषांच्या विचारातुन जीवन जगण्याची प्रेरणा मिळते : माजी मंत्री संजय बनसोडे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी शोषितांच्या व्यथा साहित्यातुन मांडल्या १ ऑगस्टला सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्याची मागणी करणार





उदगीर /प्रतिनिधी :- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना दलित साहित्याचे उद्गाते म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे होते. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांच्या साहित्याचे योगदान आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराज आणि फुले, शाहु, आंबेडकर यांचे विचार आपल्या पुढच्या पिढीला दिले पाहिजेत. आपल्या सर्व महापुरुषांच्या विचारातुन आपल्याला जीवन जगण्याची प्रेरणा मिळत असल्याचे मत माजी मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरात आयोजीत साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा व चबुतरा बांधकाम करणे या भव्य भूमिपूजन सोहळा व साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या सार्वजनिक जयंती महोत्सव समिती उदगीरच्या वतीने आयोजीत कार्यक्रम बोलत होते. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास माजी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी जि.प अध्यक्ष राहुल केंद्रे, बन्सीलाल कांबळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिणीस समीर शेख, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुनिल सावळे, रामदास बेंबडे, शहराध्यक्ष अमोल अनकल्ले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, शहराध्यक्षा मधुमती कनशेट्टे, अ‍ॅड. वर्षा कांबळे, प्रा.पंडित सुर्यवंशी, प्रा.शिवाजी देवनाळे, जवाहरलाल कांबळे, रवींद्र बेंद्रे, प्रा.बिभीषण मद्देवाड, प्रल्हाद येवरीकर, प्रा.गोविंद भालेराव, शिवाजी सुर्यवंशी, प्रकाश राठोड, बाळासाहेब मरलापल्ले, अनिल मुदाळे, राजकुमार चव्हाण, गणेश गायकवाड, प्रदीप जोंधळे, संजय गायकवाड, ज्ञानेश्वर बिरादार येणकीकर, पोलीस निरीक्षक दिलीप गाडे, रुपेंद्र चव्हाण,गणेश गायकवाड, सावन पस्तापुरे, नरसिंग शिंदे, राजु मुक्कवार, बाळासाहेब पाटोदे, विजय होनराव, रवींद्र बेंद्रे, अरविंद शिंदे, बालाजी रणदिवे, अजित कांबळे, राजकुमार चव्हाण, राम शिंदे, अमर सुर्यवंशी, सुलोचना जाधव, माया कांबळे, अरूणा चिमेगावे, राहुल सोनवणे, रविप्रभा खादीवाले, उर्मिला वाघमारे, शख हुस्ना बानो, संघशक्ती बलांडे, अविनाश गायकवाड, सतिश कांबळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना. संजय बनसोडे यांनी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे कार्य मोठे असुन समाजबांधवांच्या भावनेचा व मागणीचा विचार करुन त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान देवून गौरव करावा अशी विनंती राज्य शासनाच्या वतीने ठराव केंद्राकडे पाठवावा अशी विनंती मी राज्याचे मुख्यमंत्री देवद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी शोषिंताच्या व्यथा साहित्यातुन मांडल्या व त्यांना न्याय दिला आहे. उदगीर येथील समाजबांधवांच्या सूचनेनुसारच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पंधरा फुटाचा पुर्णाकृती पुतळा उभारणार असुन मागील काळात जळकोट शहरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंचा पुर्णाकृती पुतळा उभारला आता उदगीर शहरात त्यांच्या नावाने भव्य स्मारक उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. चिरागनगरमध्ये अण्णाभाऊ साठेंचे स्मारक उभारणार आहे तर पुण्याला लहुजी साळवे यांचे स्मारक उभारत आहोत. बार्टीच्या तत्वावर अर्टीची स्थापना झाली असून यामुळे मातंग समाजातील तरुण मुलांना याचा फायदा होईल. भविष्यात उदगीर शहरात अण्णाभाऊ साठेंचा पुर्णाकृती पुतळा उभारुन पुतळ्या शेजारी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंच्या नावाने म्युझियम, स्मारक व अभ्यासिकेसाठी १५ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला असुन त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

मागील काळात उदगीर मतदार संघात सामाजिक सलोखा ठेवुन उदगीर मतदार संघाचा विकास केला आहे. येत्या काळातही उदगीरला विकासाच्या माध्यामातून महाराष्ट्रात नंबर एकला आणणार असल्याची ग्वाही ना.बनसोडे यांनी उपस्थित समाजबांधवांना दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गालट यांनी केले तर आभार पप्पु गायकवाड यांनी मानले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## भारत-अमेरिका नवा तणाव

सत्तेवर येताच आक्रमक व्यापार धोरणांची कास धरलेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, कॅनडा, मेक्सिको यांच्यावर प्रचंड टॅरिफ लावून व्यापार युद्ध सुरू करणार्या ट्रम्प यांनी आता भारतालाही या संघर्षाच्या झोनमध्ये आणले आहे. भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा आणि रशियाकडून तेल घेणे थांबवण्याची अप्रत्यक्ष धमकी या दोन्ही गोष्टींनी भारत-अमेरिका संबंधांमध्ये नव्या तणावाची भर घातली आहे.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच ट्रम्प यांनी संरक्षणवादी अजेंड्याच्या माध्यमातून चीन, कॅनडा आणि मेक्सिको यांच्यावर भरभक्कम टॅरिफ लावून व्यापार युद्धाची सुरुवात केली आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये मोठा हलकल्लोळ निर्माण झाला आहे. या तीनही देशांनी त्याला प्रत्युत्तर देण्याची घोषणा केल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार युद्ध सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कॅनडाने आधीच अमेरिकन आयातीवर टॅरिफ लावण्याची घोषणा केली आहे, तर मेक्सिको देखील तशीच भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे, मागील टॅरिफ संघर्षामुळे आधीच त्रस्त असलेला चीन आता जोरदार प्रत्युत्तराची तयारी करत आहे. चीन हे प्रकरण जागतिक व्यापार संघटनेकडे घेऊन जाण्याचा विचार करत आहे. यादरम्यान भारतावर अमेरिका किती टॅरिफ आकारणार याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली होती; पण डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच एक उपरोधिक टिप्पणी करत मित्र भारत १ ऑगस्टपासून २५ टक्के टॅरिफ भरू लागेल, अशी घोषणा केली आहे. तसेच रशियाकडून तेल आयात सुरू ठेवल्याबद्दल भारताला दंडालाही सामोरे जावे लागेल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे टॅरिफच्या मुद्द्यावरून अमेरिका-भारत यांच्यात तणाव निर्माण झाला आहे.

वास्तविक, भारतासोबत व्यापार करताना अमेरिकेला अधिक फायदा व्हायला हवा, ही ट्रम्प यांची मागणी आहे. अमेरिका भारताला जितका निर्यात करू शकतो, तितका तो करु शकत नाही. भारताचे टॅरिफ खूप जास्त आहेत आणि भारत जागतिक व्यापारात सर्वाधिक कडक धोरणं अवलंबतो, ही तक्रार ट्रम्प एकसलगपणे करताहेत. प्रत्यक्षात ही तक्रार किंवा भूमिका खरी नाही. त्यांना भारताच्या परिस्थितीची काहीही पर्वा नाही. खेदाची गोष्ट म्हणजे, ते भारताला 'मित्र' म्हणतात; पण त्यांना भारताची खरंच काळजी आहे का, हेच स्पष्ट नाही. आता प्रश्न उरतो तो ट्रम्प यांच्या निर्णयात आगामी काळात काही बदल होण्याची शक्यता आहे का? अधिक टॅरिफमुळे दोन्ही देशांमधील मैत्रीवर परिणाम होईल का? सध्या असे अनेक अभियान व करार अस्तित्वात आहेत, ज्यांच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका एकत्रित मैत्रीच्या वाटचालीवर आहेत. निसार उपग्रह हे याबाबतचे ताजे उदाहरण आहे. भारत-अमेरिका भागीदारीचं एक फलित म्हणून याकडे पहावे लागेल. मग, इतक्या मोठ्या टॅरिफनंतरही दोन्ही देशांतील संबंधांवर परिणाम होणार नाही का? तर निश्चितच परिणाम होईल.

ट्रम्प यांनी ही घोषणा पारंपरिक माध्यमांद्वारे केलेली नाही, तर 'ट्रूथ' या त्यांच्या खास सोशल प्लॅटफॉर्मवरून ही माहिती प्रसिद्ध केली आहे. जेव्हा अधिकृत स्वरूपात स्पष्ट घोषणा होतील, तेव्हाच या निर्णयांचे गांभीर्याने विश्लेषण सुरू होईल. येत्या काळात अमेरिका आणि भारत यांच्यातील सीमा शुल्क करार कोणत्या तत्त्वांवर आधारित होतो हे पहावे लागेल. ट्रम्प यांनी भारत आणि रशिया यांचं मैत्रीपूर्ण नातं आपल्याला अजिबात आवडत नाही, ही गोष्ट लपवलेली नाहीये. खरं तर, ही गोष्ट अमेरिकेला पूर्वीपासूनच खटकत होती; मात्र भारताने या बाबतीत फार चिंतेत राहण्याची किंवा आपल्या निर्णयांमध्ये फारसे बदल करण्याची आवश्यकता नाही. ज्यांना आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचं ज्ञान आहे, त्यांना ही बाब माहीत आहे की, अमेरिका नेहमीच आर्थिक आणि लष्करी आघाड्यांवर पाकिस्तानसोबत उभा राहिलेला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान शस्त्रसंधीचे श्रेय घेण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न जगाने पाहिला आहे. इतकेच नव्हे तर त्यानंतर पाकिस्तानी लष्करी अधिकार्यांसोबत मेजवानी घेऊन त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. याआधीच्या कार्यकाळात ट्रम्प यांनी २०१८ मध्ये भारतावर २५ उत्पादनांवर आयात शुल्क लावले होते. यामुळे भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसला होता. भारताने २०२३-२४ मध्ये उत्पादन क्षेत्रातून सुमारे ७७.५ अब्ज डॉलरची निर्यात केली होती.

भारतात उत्पादन क्षेत्रात सध्या सुमारे ४.५ कोटी लोक कार्यरत आहेत. निर्यातीवर परिणाम झाला, तर रोजगार गमावण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. कापड, खेळणी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स, औषधे अशा क्षेत्रातील उत्पादनांचे मोठे प्रमाणात अमेरिकेत निर्यात होते. या क्षेत्रातील लघुउद्योग ट्रम्प यांच्या धोरणांचा सर्वाधिक फटका बसू शकतो. यामुळे गुंतवणुकीतही घट होण्याची शक्यता आहे.

भारत अमेरिकेला मोठ्या प्रमाणात वस्त्र, औषधे, स्टील उत्पादने, कृषी उत्पादनं, गहू, भात, आयटी सेवा, इंजिनिअरिंग वस्तू निर्यात करतो. मोबाईल फोन उत्पादनात भारत अमेरिकेसाठी दुसर्या क्रमांकाचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या कार्यकाळात या तुटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतावरील जीएसपी सवलतही रद्द केली होती. त्यामुळे भारतीय निर्यातदारांना मोठा फटका बसला होता. जानेवारी २०२५ मध्ये अध्यक्ष बनल्यानंतर ट्रम्प यांनी एप्रिल महिन्यातही भारतीय वस्तूंवर २७ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती. आता जर ही नवीन घोषणा लागू झाली आणि त्यात दंड देखील समाविष्ट झाला, तर टॅरिफ दर २७ टक्क्यांहून अधिकच राहील. त्यामुळे भारतीय उद्योजकांनी पूर्ण तयारी ठेवली पाहिजे.

# अवकाशातील लढाईची तयारी

अवकाशस्थानकं स्थापनेची विविध देशांमध्ये स्पर्धा सुरू आहे. पण यामागचा छुपा उद्देश अवकाशातील लढाईची तयारी तर नाही ना, अशी तज्ज्ञांना शंका वाटत आहे.

अवकाशात स्थापन केलेल्या अवकाशस्थानकाच्या माध्यमातून भविष्यात काही देशांकडून क्षेपणास्त्र हल्ले होण्याची शक्यता पाहता भारतदेखील अवकाश क्षेत्रात पावले टाकताना दिसत आहे. आपण इतरांपेक्षा अधिक काळ मागे नाही. पुढील दहा वर्षांत स्वत:च्या अवकाशस्थानकात स्वत:चे अंतराळवीर उतरवण्याची शक्यता आहे. यासाठी भारतीय शास्त्रज्ञांचे प्रयत्न शेवटच्या टप्प्यात आहे. एकुणातच ही मोहीम दहा वर्षांत तडीस पोचू शकते आणि अवकाशात देखील भारत यशाचे शिखर पादाक्रांत करू शकतो.

आत्मनिर्भरच्या दृष्टीने वाटचाल करताना जमिनीपासून हजारो किलोमीटर अंतरावर अवकाशात भारताचे स्वत:चे स्थानक असेल. भारतीय अवकाश संस्था 'इस्रो'कडून २०३५ पर्यंत अवकाशात स्वत:चे स्पेस स्टेशन स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. भविष्यात एखादा अंतराळवीर अवकाशात प्रवास करेल तेव्हा तो स्वत:च्याच अवकाशस्थानकात उतरेल.

अर्थात, जगातील शक्तिशाली देश अवकाश क्षेत्राला प्राधान्य का देत आहेत? ते सातत्याने नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याच्या मागे का लागले आहेत? कदाचित भविष्यात अवकाशस्थानकाच्या माध्यमातून क्षेपणास्त्रे डागण्याची योजना तर आखत नाही ना? अशा प्रकारचे प्रश्न तज्ज्ञांच्या मनात उपस्थित होत आहेत. अर्थात, प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. कारण सध्याच्या काळात बहुतांश देश जमिनीऐवजी आकाशातून संघर्ष करत आहेत. समोरासमोरची लढाई टाळत क्षेपणास्त्रे डागली जात आहेत. इराण इस्रायल, गाझा, पॅलेस्टिन, युक्रेन-रशिया आणि अलीकडचे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव हे त्याचेच उदाहरण आहे. म्हणूनच आगामी संघर्षाच्या ठिणग्या अवकाशात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आतापर्यंत दोन देशातील संघर्ष हा आपण जमीन, हवा आणि पाणी यावरच पाहिले. परंतु भविष्यातील लढाई अवकाशातून लढली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गोष्टी आश्चर्यकारक वाटू शकतात, परंतु तसे घडण्याची शक्यता अधिक वाटू लागली आहे.

अवकाशस्थानकात युद्धासंदर्भात शास्त्रज्ञांनी काही शोध लावले असून त्यासंबंधीचे काम अनेक दशकांपासून सुरू आहे. आतापर्यंत अवकाशात दोनच स्थानकं आहेत. पहिले 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' आणि ते अमेरिका आणि रशिया याच्या संयुक्त प्रयत्नातून आकारास आले. तर दुसरे स्थानक चीनचे असून ते खासगी आहे. अर्थात, आता रशिया, अमेरिका, भारत आणि अन्य एक देश आपापले खासगी स्थानक तयार करण्याच्या शेवटच्या टप्प्यात पोचले आहेत.

पुढील दहा वर्षांत भारताबरोबरच रशियादेखील स्वत:चे स्थानक स्थापन करेल. त्याचा उद्देश हा अवकाशातील प्रयोग करण्याचा असला तरी या माध्यमातून काही उपग्रहांना क्षेपणास्त्र हाताळण्यासाठी कामाला लावले जाण्याची शक्यता आहे. तूर्त ४१ वर्षांनंतर शुभांशु शुक्ला यांच्या रूपातून भारताचा एक अंतराळवीर अवकाशात जाऊन आला. त्यांच्या अवकाश प्रवासाचे माध्यम ॲक्सिओम मिशन-४ का असेना, परंतु भविष्यात परकी यानावरचे अवलंबित्व संपण्याची शक्यता आहे. चीनच्या मालकीचे असणार्या खासगी अवकाश स्थानकाच्या दिशेने भारतदेखील जवळपास पोचला आहे.

२००९ मध्ये अमेरिकेने रशियासमवेत एक करार केला आणि त्यात स्वत:चे अवकाशस्थानक तयार करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाचे महत्त्व आता लक्षात येत आहे. स्वत:चे खासगी अवकाश स्थानकाच्या माध्यमातून अमेरिका अवकाशातून क्षेपणास्त्र लढाई करण्याची योजना आखत आहे. अवकाशात देखील दबदबा निर्माण करू इच्छित आहे. पृथ्वीपासून अवकाशस्थानक गाठण्यासाठी २८ तास लागतात. एवढ्या मारक क्षमतेचे क्षेपणास्त्र अमेरिका तयार करत आहे. अवकाशात २४ तासांत १६ वेळेस सूर्योदय होतो आणि १६ वेळेस सूर्यास्त होतो.

# मेंदूचा विकासच नाही तर आरक्षण कळणार कसे?

कोणतेही कारण नसताना आरक्षणाचा मुद्दा उकरून काढून, आरक्षणावर काही चुकिची माहिती देऊन वाद निर्माण करण्याचे काम मेंदूचा विकास न झालेले लोक करत असतात. आरक्षणाचा लाभार्थी असुनही आरक्षणा बद्दल चुकीचे विधान करणारे प्रत्येक जन बुद्धीने कमकुवतच असतो. आरक्षण जातीला आहे आणि त्यातही एकाच जातीला आरक्षण आहे असे समजणाऱ्यांनी तरी आपल्या बुद्धीची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. कारण आरक्षण हे जातीला नसुन प्रवर्गाला आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गात २६१ जातींचा समावेश आहे. एसटी प्रवर्गात ४७ जातींचा समावेश आहे आणि एस सी प्रवर्गात ५९ जातीचा समावेश आहे. आणखी विशेष म्हणजे एस सी मधील महार जात सोडली तर बाकी अपवाद वगळता सर्व जाती हिंदू धर्मातीलच आहेत. ही सर्वसामान्य माहिती ज्याला माहिती नाही तो बुद्धीने गरीबच समजावा. जवळपास सर्वच जातींना आरक्षणाचा फायदा मिळत असताना आरक्षणा बद्दल अपशब्द येतात कसे हा खरा मुद्दा आहे. आरक्षणाबाबत चुकीचे तेच लोक बोलतात एक तर त्यांची बुद्धी कमी आहे नाहीतर ते कोणाचे तरी गुलाम आहेत. बरेच लोक म्हणतात आरक्षण हे जाती आधारित नाही तर आर्थिक निकषांवर पाहिजे. असे बोलणाऱ्या लोकांच्या डोक्यात मेंदू आहेच की नाही ही शंका निर्माण होते? कारण आरक्षण कोणत्या जातीला आहे? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या कडे नाही. आणि आरक्षणाची गरज का पडली याचा इतिहास ज्यांना माहिती नाही त्यांनी आरक्षणावर बोलणे म्हणजे आपण निर्बुद्ध असल्याचे सिद्ध करणे होय. आरक्षण समजण्यासाठी समाज व्यवस्था व इतिहास माहिती असणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट आरक्षणाचे लाभार्थी कोण आहेत हे माहिती असणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास महाराष्ट्रात तेली, साळी, कोळी, माळी, कुणबी, धनगर, बंजारा, वंजारी, अशा सगळ्याच जाती आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या असतील आणि याच जातीतील लोक बुद्धीचा वापर न करता आरक्षणावर बोलत असतील तर ते आपल्याच समाजाचा घात करत आहेत. आरक्षण आर्थिक निकषांवर नाही कारण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नसुन तो सामाजिक प्रतिनिधित्वाचा प्रश्न आहे. गरीबी हटाव साठी शासनाकडे वेगवेगळ्या योजना असतात त्यावर हजारो करोडो रुपये खर्च होतात. योजना कागदावर आणि पैसे राजकारण्याच्या घरात जातात तो भाग वेगळा पण आरक्षण गरीबी हटाव चा कार्यक्रम नाही. गरीबी प्रत्येकाची दुर झालीच पाहिजे त्यासाठी सरकारला धारेवर धरून प्रत्येकाने प्रश्न विचारलेच पाहिजे. पण सरकारला प्रश्न न विचारता आरक्षणाला दोष देऊन गरिबी हटाव सोबत संबंध जोडणारा प्रत्येक जन हा बुद्धीने कमकुवत आहे. बरेच स्वंयघोषित विद्वान, सुशिक्षित लोक म्हणतात आरक्षण नकोस बुद्धीमत्तेनुसार संधी असायला हवी. बुद्धीमत्ते नुसार संधी असायलाच हवी यामध्ये कुठेच दुमत नाही. पण प्रश्न हा आहे की आपल्याला बुद्धीमत्ता पचते का? बुद्धीमत्तेच्या गोष्टी करून आरक्षण नाकारणारे लोक खरचं बुद्धीमत्तेची कदर करणारे असते तर जगातील सर्वात बुद्धीमान महामानव, जगाचा उद्धारक ज्ञानाचा महासागर तथागत सिद्धार्थ बुद्ध आज त्यांच्या घरात असते. बुद्धीमत्तेची जाणीव असती तर सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव संपूर्ण जग करते आणि आपल्या येथे त्यांना च जातीत बंद केले जाते त्यांनी बुद्धीमत्तेच्या गोष्टी कराव्यात? बुद्धीमत्तेच्या गोष्टी करणारे बुद्धीहीन लोक संविधान एकाच जातीचे आहे असे म्हणतात त्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे स्वतः च स्वतःच्या बुद्धीने प्रदर्शन मांडणे होय. ज्या लोकांना तथागत गौतम बुद्ध, महात्मा फुले, शाहु महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर, संत कबीर, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत नामदेव महाराज यांचे विचार व कार्य मान्य नसतील त्यांची बुद्धी किती विकसित असेल याचा अंदाज येतो. तरीही ते म्हणत असतील बुद्धीमत्ते नुसार नोकरी मिळाली पाहिजे. तर नोकरी बुद्धीमत्ते नुसारच मिळते पण काही प्रश्नांची उत्तरे मिळाली तर चांगले होईल. लग्न बुद्धीमत्ता बघुन होतात की जात? मंदिरात प्रवेश नाकारला जातो बुद्धीमत्ता बघुन की जात? मंदिरात पुजारी असतात बुद्धीमत्ता बघुन की जात? आज पर्यंत भोंदू तयार झाले, पाखंडी तयार झाले, बलात्कारी तयार झाले लाखो लोक त्यांच्या पायावर झुकले बुद्धीमत्ता बघुन की जात? पाखंडी, बलात्कारी, भोंदू लोकांच्या पायावर लोटांगण घेणारे आणि महापुरुषांना वंदनही न करणाऱ्यांनी बुद्धीमत्तेवर बोलावे म्हणजे आश्चर्यच आहे. आरक्षण हा खुप खोल व गंभीर विषय आहे. आरक्षणामुळे अनेकांना प्रतिनिधित्व मिळाले. ज्यांना गाव बंदी होती, ज्यांच्या सावलीचा विटाळ व्हायचा, मडके बणवणारा, धान्य पिकवणारा, कपडे धुणारा, माळी काम करणारा, मेंढ्या राखणारा, दगड फोडणारा, मेलेली जनावरे ओढणारा आरक्षणामुळे कलेक्टर, पोलीस अधीक्षक सारख्या महत्वाच्या पदावर जाऊन बसले आणि त्यांचा सामाजिक विकास झाला. आरक्षणावर चुकिचे बोलुन सामाजिक वातावरण दुषित केले जाते. पण सत्य परिस्थिती बघुन समाजाला जागृत करण्याची हिम्मत कोणी करत नाही. आरक्षणाचे लाभार्थी यांना गुणवत्ता धारक वाटत नसतील तर आपण ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही ती परिस्थिती बघु. आता ज्या ठिकाणी आरक्षण लागु नाही तेथे जे बुद्धीमान लोक बसलेले आहेत त्यांच्या बद्दल बोलले तर जातीवाद होतो. तरीही आपण उदाहरण म्हणू बघु या. देशात आरक्षण सोडून ख-ड, खझड कोण आहेत? आदिवासी समुहाचे जातप्रमाण पत्र घेऊन कोणी नोकऱ्या हडप केल्या? सर्वोच्च न्यायालयाचा व उच्च न्यायालयाचा मुख्य नायधिश होण्यासाठी कोणतेही आरक्षण नाही तेथे किती तेली, साळी, कोळी, माळी, धनगर, कुणबी, वंजारी, बंजारा लोक आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? का होऊ शकले नाहीत ते न्यायधीश? चझडउ, णझडउ मध्ये कुणबी, तेली, साळी कोळी, माळी, धनगर जाती सह ज्यांना ज्यांना आरक्षण आहे त्या उमेदवारांना लेखी परिक्षेत जास्त गुण मिळतात आणि मुलाखती मध्ये कमी गुण मिळतात हे कशामुळे? णझडउ ची परिक्षा न घेता, आरक्षणाचा विचार न करता सरळ सचिव पदावर दरवर्षी खाजगी क्षेत्रातील उमेदवार बसवले जातात त्यामध्ये किती कुणबी, मराठा, तेली, साळी, कोळी, माळी धनगर आहेत? यांच्या कडे गुणवत्ता नाही? याचा विचार कोणी करणार आहे की नाही? औद्योगिक क्षेत्र व प्रसारमाध्यमांमध्ये आरक्षण नाही तर मराठा, तेली, कुणबी ,माळी, धनगर, थोडक्यात आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या लोकांच्या किती कंपन्या आहेत? यांच्या किती मोठमोठ्या बँका आहेत? किती टिव्ही चॅनल हे मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार यांचे आहेत? का यांच्या कडे कंपनी सुरू करायला,चॅनल सुरू करायला बुद्धीमत्ता नाही? बर ते सोडा मराठा, कुणबी, माळी, धनगर तेली, साळी, कोळी, कुंभार या पैकी किती लोक मोठमोठ्या मंदिरात पुजारी आहेत? का यांच्या कडे बुद्धीमत्ता नाही? ज्या ठिकाणी आरक्षण नाही तेथे मक्तेदारी कोणाची आहे? तेथे एकच लॉबी कशी काय टिकुन आहे हा मुळ प्रश्न असताना तो बाजूला सारून आरक्षणावर बोलुन बुद्धीचे प्रदर्शन मांडले जाते. आरक्षणाच्या नावाखाली एकाच जातीला लक्ष केले जाते. जेथे आरक्षण नाही तेथे कोणत्या जातीचे लोक राहतात हा साधा प्रश्न जरी केला तरीही जातीवाद होतो. म्हणून आरक्षण हे सर्वांना समान संधी देऊन सामाजिक प्रवाहात सर्वांना समान करते. म्हणून सामाजिक आरक्षण हे भारतीय समाजाला खुप आवश्यक आहे. विद्वत्तेच्या पोकळ गप्पा करणाऱ्या जर संविधानाचे गांभीर्य नसेल त्या व्यक्तीएवढा मंद व्यक्ती दुसरा कोणीही नसेल. म्हणून आरक्षणावर बोलणे, आरक्षण समजून घेणे, हे येड्या गबाळाचे काम नाही. फालतू सोशल मिडीयावर येऊन नको ते कुटाणे करून स्वतः आरक्षणाचे लाभार्थी असताना आणि सामाजिक विकासासाठी आरक्षणा शिवाय दुसरा पर्याय नसताना आरक्षणाबाबत चुकीचे बोलणे म्हणजे स्वतःच्या पायावर स्वतः च कुऱ्हाड मारून आपली बुद्धी किती कमकुवत आहे हे दाखवणे होय.

************
विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत ओबीसींचे गुरु कोण?




लोकसभा विधानसभेत देशातील ५२ टक्के ओबीसींचे पानिपत झाले.आता उरल्या सुटल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका बाकी आहेत.या निवडणुकांत आपले अस्तित्व ओबीसी राखतील का? यात ते हरले तर त्यांची घरे गावठाणे रोजी,रोटी धोक्यात आहे. पानिपतची लढाई आम्ही देशासाठी लढलो.असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अभिमानाने सांगत आहेत. पेशवाई बद्दल महात्मा जोतिबा फुले,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सारे सांगतात.शूद्र ओबीसींना गुलाम करणारी,मनुस्मृती नुसार विषमतावादी असलेली,ही अत्यंत क्रूर शोषक शासन व्यवस्था स्त्रीशुद्राती शूद्रांच्या विरोधी होती.भारतीय संविधानाच्या माध्यमातून धार्मिक विषमतेच्या विरोधात सुरू असलेली लढाई आज आम्ही हरलो आहोत.पुन्हा पेशवाई महाराष्ट्रात सुरू आहे.महाराष्ट्रात घडणाऱ्या सामाजिक आर्थिक राजकीय.शोषणाच्या सर्व घटना आम्हा ओबीसी विरोधात आहेत.त्यांचा उल्लेख किती करायचा?आमचे अनेक लोक आज हिंदुत्वाच्या फडणवीस,पवार, शिंदे गटात आनंदाने जगत आहेत.मग गुलामी आहे कुठे ? असा प्रश्न सामान्य ओबीसी कार्यकर्त्यांना पडत असेल.

वर्तमान काळात ओबीसी शिक्षण,आरक्षण,घरे गावठाणे उद्योग,व्यवसाय,धोक्यात आहेत.हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे.ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या अन्याय अत्याचारा बद्दल मी अधिक बोलावे,असे मला वाटत नाही.ओबीसी जागृतीचे अनेक प्रबोधनकार आपल्याकडे झाले आहेत.तरीही ओबीसींची मानसिक गुलामी हीच त्यांच्या शोषणास खरे कारण आहे.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात प्रथम परकियाना हटवावे की देशातील हिंदू ब्राह्मणी धर्माने लादलेल्या विषमते विरोधात लढावे? असा वाद तत्कालीन नेतृत्वात होता.

ओबीसी जातींनी आज जी काही प्रगती साधली आहे ती भारतीय संविधानाच्या माध्यमातून,समतेच्या तत्वाने मिळविलेले यश आहे.या यशाला हिंदू धर्मगुरु पुरोहित,बुवा बापू,ज्योतिषी,पवार फडणवीस शिंदे या सत्ताधारी राजकीय गुरूंचे यश आहे?.असे आमच्यातील ओबीसी कार्यकर्त्यांचे म्हणणे असू शकते?. निवडणुकांचा फॉर्म काळजी पूर्वक भरण्या ऐवजी ग्रह तारे ज्योतिष,तथाकथित गुरु,गंडे दोरे,भस्म यावर त्याचा अधिक भर असतो.मुहूर्त पाहिले जातात.तरीही पराभव होतो.म्हणून या धार्मिक कार्ये,पूजा,पुजारी नवस याविरोधात कुणाचीही तक्रार नसते.समुद्रात बुडालेली नौका सत्य नारायण पूजेने वर येते?.कालच रायगड उरणच्या परिसरात आगरी कोळ्यांच्या दोन मासेमारी नौका आणि खलाशी बुडाले.बुडालेल्या नौका आणि गेलेले जीव पुन्हा कुणी देव,गुरू,पूजा नवस आणून देऊ शकतो का?

लोकसभा विधानसभेत साऱ्या प्रमुख उच्चजातीच्या पक्षांनी ओबीसींना प्रथम तिकिटे नाकारली.जे सर्व संघर्ष करून लढले. त्यांच्या पराभवाची सर्व मानवनिर्मित व्यवस्था काळजी पूर्वक करूनच निवडणुका जिंकल्या गेल्या.यात नोटबंदी ही आर्थिक नाकेबंदी होती.निवडणूक आयोग,पोलिस,ईडी,यांचा उपयोग म्हणजे आधुनिक मनुस्मृतीचे भ्रष्ट रूप होते.आम्ही भ्रष्टाचारा विरोधी आहोत.असे सांगून त्याचे जागतिक विक्रम सत्ताधारी लोकांनी केले.या साऱ्या प्रकारात ओबीसी निवडून येणार कसे?.राजकीय जीवनात ओबीसींना यशस्वी व्हायचे असेल?.तर सामाजिक आर्थिक समतेची लढाई अगोदर लढावी लागेल. हे आमचे नेते संविधानकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर सागून गेले. याच मार्गाने रायगड कोकणात कुळ कायद्यासाठी नारायण नागू पाटील लढले.सेझ विरोधी ड.दत्ता पाटील लढले.सिडको विरोधात लोकनेते दि.बा.पाटील साहेब लढले.या मार्गावर तुमच्यासह अनेक कार्यकर्ते लढत आहेत.आज स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये निवडणुका लढण्यासाठी पैसे ओबीसी उमेदवारांकडे नाहीत.या स्थितीस स्वातंत्र्य पूर्व काळातील पेशवाई मनुस्मृतीच्या धार्मिक विषमतेची उपमा योग्य होईल.शूद्रांच्या वाईट स्थितीस त्यांच्या पूर्व जन्मातील पाप कारणीभूत आहे.असे उत्तर ब्राह्मण क्षत्रिय वैश्य देतात.अर्थात या सर्व खोट्या गोष्टींची धर्म चिकित्सा बुद्ध,चार्वाक,महावीर आणि फुले शाहू आंबेडकर यांनी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षण आपल्या संविधानाने दिले आहे.ही गोष्ट हिंदू धर्म प्रमुखांना मान्य नाहीच. म्हणूनच महानगर पालिकेत निवडणूकच होऊ नये? याची काळजी घेतली गेली.महानगर पालिकेत निवडून आलेले नगरसेवक नसताना, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रचंड लूट,नगरविकास खाते करते.याबद्दल साऱ्या महाराष्ट्रात वनमंत्री गणेश नाईक हे आगरी ओबीसी राजकीय नेते प्रचंड आक्रोश करत आहेत.तरीही महाराष्ट्रातील अनेक ओबीसी नगरसेवकांना हा राजकीय नेतृत्वाचा हक्क नाकारणारा,एकलव्यासारखा अंगठा कापण्याचा ब्राह्मण क्षत्रिय वैश्य राजगुरूंचा निर्णय समजलेला नाही.

आम्हाला राजकीय सत्ता नाकारली म्हणजेच आम्ही शूद्र ठरलो.सरकारी नोकऱ्या, शिक्षण,जमिनी पाणी,जंगल मानवी अधिकार,धार्मिक हक्क या सर्व बाबतीत घडले. यासाठी देव,धर्म,धर्मग्रंथ,आडवे आले.ते अनेक शूद्र अतिशूद्र लोकांनी नाकारले.यातील मनुस्मृती विरोधी लोक हेच आमचे खरे गुरू आहेत.त्यांनी केलेला धार्मिक, आर्थिक,राजकीय संघर्ष,हा आमच्या राजकीय संघर्षाचा आधार आहे.तत्वज्ञान आहे.हा विषय समजून न घेतल्यास ओबीसी नगर सेवकांची राजकीय गुलामी निश्चित आहे




**********
जय ओबीसी.जय दिबा. जय एकवीरा.
राजाराम पाटील.८२८६०३१४६३.उरण ,जिल्हा रायगड.

# कार्यकारी अभियंता यांना निलंबित करा - ॲड. इर्शाद पटेल

नांदेड / प्रतिनिधी :- महाराष्ट्र व तत्कालीन आंध्र प्रदेश राज्याचा संयुक्त प्रकल्प म्हणून लेंडी प्रधान प्रकल्प ओळखला जातो.मात्र विविध कारणाने मागील ३८ वर्षांपासून हे प्रकल्प रखडलेले होते. प्रशासन व प्रकल्प बाधित नागरिकांच्या अटीस अधीन राहून प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले. प्रकल्पग्रस्तांकडून शासनाकडे काही मागण्या होत्या ज्यामध्ये शेतीचा सानुग्रह अनुदान असेल, वाढीव कुटुंबाचा मावेजा असेल, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकरकमी अमुक रक्कम देण्याचे असेल, प्रवास भत्ता असेल, बेरोजगारांसाठीचा मुद्दा असेल अशा विविध मागण्या प्रशासनाकडे मांडण्यात आल्या. कालांतराने मागण्या पूर्ण करण्याच्या अटीवर प्रशासनाने घळभरणीचे काम सुरू करण्याचा डाव घालून प्रकल्पग्रस्तांचे कंबरडेच मोडले. कारण वरील मागण्या अजून पर्यंत पूर्ण झालेल्या नाहीत.

अशातच लेंडी प्रधान प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील रावणगाव या गावचे पुनर्वसन खानापूर जवळील देगलूर तालुक्यात करण्यात आले. प्रशासनाकडून पुनर्वसनात २४ नागरी सुविधा पूर्ण करने बंधनकारक असते. सदरील उर्वरित कामे व क्षितीग्रस्त कामे सध्या पुनर्वसनात चालू आहेत. मात्र ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याने संबंधित विभागास पत्राद्वारे कळविण्यात आले होते.मात्र कार्यवाहीच्या अनुषंगाने कोणतीच हालचाल न दिसल्याने एडवोकेट इर्शाद पटेल यांच्या नेतृत्वात सबंध गावकऱ्यांनी एकत्रित येऊन काम बंद पाडले. काम बंद पडताच प्रशासन खळबडून जागी झाले. आणि लगेचच उपजिल्हाधिकारी यांनी स्वतः प्रत्यक्षरीत्या कामाची पाहणी केली. ज्यामध्ये त्यांना अनेक ठिकाणी कामात अनियमितता झाल्याचे दिसून आल्याचे एका चॅनलच्या माध्यमातून सांगितले. शिवाय चालू असलेल्या नाली व रस्त्याचे काम पुन्हा करण्याचे आदेश दिले. याशिवाय जिल्हाधिकारी यांनी सुद्धा घळभरणीच्या मोबदल्यात पुनर्वसनातील कामांमध्ये नो कॉम्प्रोमाइज असा शब्द वापरून सुद्धा जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांच्या आदेश व सूचनेस केराची टोपली दाखवत कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांनी गुत्तेदारासोबत मिलीभगत करीत बोगस कामांचा सपाटा लावला.ज्यातून पुनर्वसित नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाची कामे पुन्हा नव्याने करण्याच्या अटीवर कामे चालू करण्यात आली. मात्र संबंधित प्रशासन व गुत्तेदाराने आजतागायत कोणतीच कामे न केल्यामुळे



दिनांक ४/ ८ /२०२५ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसत असल्याचे इर्शाद पटेल यांनी सांगितले. शिवाय जोपर्यंत उर्वरित शेतीचे सानुग्रह अनुदानातील जाचक अटी रद्द करणे, वाढीव कुटुंबाचा मावेजा, विणा अट देने, २१ वर्षे पूर्ण झालेल्यांना वाढीव कुटुंबाचा मावेजा देणे, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकमुस्त रक्कम, शासन नियमानुसार वाहतूक भत्ता, व रोजगाराचा मुद्दा जोपर्यंत पूर्ण होणार नाही, तसेच कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता लेंडी प्रधान प्रकल्प देगलुर यांना दोषी ठरवून निलंबित करण्यात येत नाही तोपर्यंत उपोषणापासून माघार घेणार नसल्याचेही एडवोकेट इर्शाद पटेल यांनी सांगितले आहे.

## सेवालयातील मुलांचे स्थलांतर थांबवा रणरागिणी संस्थेची जिल्हा महिला बाल विकास अधिकार्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

लातूर : हासेगावच्या सेवालयातील मुलांना दुसर्या बालगृहात हलविण्याचा डाव जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालयाच्यावतीने सुरू आहे. सेवालयातच एचआयव्ही संक्रमित अनाथ मुलांचे भवितव्य उज्ज्वल आहे. त्या मुलांना कुठेही हलवू नये, अशी मागणी येथील रणरागिणी कला पथक व सेवाभावी संस्थेच्यावतीने जिल्हा महिला बालविकास अधिकार्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. बालकांना हलविल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनात देण्यात आले आहे. या निवेदनात रणरागिणी कला पथक व सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून असे आवहान करण्यात आले आहे की, एचआयव्ही/ एड्स संक्रमित महिला व त्यांच्या पाल्यांच्या सुदृढ आरोग्य व उज्ज्वल भवितव्यासाठी मागील १५ वर्षांपासून काम करीत आहोत.

औसा तालुक्यातील हासेगाव येथील आम्ही सेवक संस्थेच्यावतीने चालविण्यात येणारे सेवालय बालगृह व हॅप्पी इंडियन व्हिलेजच्या माध्यमातून तेथे एचआव्ही संक्रमित अनाथ मुलांचा व सज्ञान झालेल्या मुला-मुलींचा व्यवस्थित सांभाळ केला जातो. अनेक कुटुंबे स्वावलंबी होऊन स्वतःचे संसार सुखाने थाटत आहेत. एचआयव्ही संक्रमित दाम्पत्यांना निगेटीव्ह मुले झाली आहेत. सर्व सुरळीत सुरू असताना याच सेवालयातील एका बालिकेला फूस लावून सेवालयविरोधातील विघ्नसंतोषी मंडळींनी गालबोट लावण्याचा प्रयत्न केला. सेवालयाचे प्रमुख प्रा. रवी बापटले सरांचे काम संपूर्ण जगाला माहित आहे. त्यांना बदनाम करण्यासाठी हे गुन्ह्याचे कुभांड रचण्यात येत आहे. वारंवार त्यांना अडचणीत आणण्याचा खोटा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले आहे. या गुन्ह्यातही काही तथ्य नाही, हे लवकरच न्यायालयात सिध्द होईल. परंतु, केवळ प्रा. रवी बापटले यांच्यावर गुन्हा दाखल झाला म्हणून येथील बालकांना दुसर्या ठिकाणी स्थलांतरित करण्याचा विचार आपल्या मनात आलाच कसा? सेवालयातील सर्व बालके सुखात आहेत. त्यांना नियतिपणे आरोग्य, शिक्षण, सकस भोजन, क्रीडा या मूलभूत सुविधा मिळत आहेत. राज्यभरातील एचआयव्ही संक्रमित अनाथ मुले यापूर्वी सेवालयात आणण्यात आली आहेत. आली तेव्हा ती मुले मरणासन्न होती.

त्यांना आधाराची गरज होती. परंतु, सेवालयातील मुक्त वातावरण, सकस आहार, नियमित व्यायाम यामुळे सर्व मुले आज ठणठणीत आहेत. त्यांचा सीडीफोर वाढल्याने एचआव्हीच्या औषधांची मात्राही कमी करण्यात आली आहे. बहुतेक मुले उच्च पदस्थ अधिकारी होण्यासाठी परिश्रम घेत आहेत. दोन मुलींना डॉक्टर करण्याचे प्रा. रवी बापटले यांचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांना लातूर येथे खाजगी शिकवणी लावण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दहावी व बारावीत शिक्षण घेत असलेल्या सुमारे २५ मुलांना नियमित शिक्षणासोबतच खाजगी शिकवण्याही लावण्यात आल्या आहेत. सेवालयातील मुलांनी आजपर्यंत ९० टक्क्यांपर्यंत दहावी-बारावी परीक्षेत गुण घेतले आहेत.

# कामगारांनी संघटितपणे रस्त्यावर उतरून कामगार कायद्यांचे जतन करावे : सुनील शिंदे लातुरात सफाई कामगारांचा सत्कार सन्मान सोहळा थाटात








लातूर : सफाई कामगारांनी कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्या सोबत रस्त्यावर उतरून सरकारकडून वाटोळे केले जात असलेले कामगार कायदे वाचवण्यासाठी लढाई लढली पाहिजे. आणि आपल्या न्याय हक्क मागण्या पदरात पाडून घेतल्या पाहिजे. असे प्रतिपादन राष्ट्रीय मजदूर संघ व महाराष्ट्र प्रदेश कामगार कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी लातूर येथे केले. अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने कामगार बलिदान दिनी ३१ जुलै रोजी सायंकाळी भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात आयोजित निर्व्यसनी व आपल्या पाल्याना चांगले शिक्षण देणाऱ्या सफाई कामगारांच्या सत्कार सन्मान सोहळ्यात सुनील शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुधीर अनवले हे होते. तर मंचावर लातूर काँग्रेसचे नूतन जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, कामगार नेते राजकुमार होळीकर, साखर संघांचे श्रीनिवास देशमुख, महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंत अप्पा उबाळे, महाराष्ट्र प्रदेश असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस राहुल वंजारी, हरिभाऊ मगर, शिवाजी भंडारे, हरिओम भगत आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुनील शिंदे पुढे म्हणाले, कामगार नेते होळीकर यांनी आपले आयुष्य सर्व प्रकारच्या कामगारांसाठी वेचले आहे. लातूर मनपाच्या सफाई कामगारांसाठी संघर्ष करून किमान वेतन व त्यांना सुरक्षा मिळवून दिली आहे. आपले हक्क मिळवून घेण्यासाठी त्यांच्या सोबत खंबीर उभे रहा, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी मुख्य सफाई कामगारांच्या सत्कार सन्मान सोहळ्यात आदर्श गुणवान सफाई कामगार म्हणूनगणपत क्षीरसागर, रणजित चव्हाण,सुधीर कांबळे, पप्पू सगट, परमेश्वर गायकवाड, ज्योती उपाडे, अर्चना गायकवाड, रुपाली मोर्य, एकता टेंकाळे, कविता पवार, अनुसया कांबळे, ममता गुप्ता आदी कामगारांना पूर्ण पेहराव आहेर, शाल, पुष्पहार व सन्मान चिन्ह मान्यवरांच्या हस्ते देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच थलेशिमिया फाउंडेशनच्या वतीने प्रमोद बोराटे यांनी कामगार नेते राजकुमार होळीकर यांना रक्तसेवा प्रेरणा पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके हे उपस्थित कामगारांना संबोधित करताना म्हणाले, कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी होळीकर साहेब सक्षम आहेत. जर कुठं अडचण आली तर मला सांगा, मी माझ्या पद्धतीने सोडविलं. आतापर्यंतचे सगळे कामगार कायदे हे काँग्रेसच्या काळात झालेले आहेत. आपल्याला विचारांचा फुले -शिव-शाहू -आंबेडकर, नारायण मेघाजी लोखण्डे यांच्या विचाराचा वारसा आहे.आताचे सरकार बाप नसलेले आहे. कामगारांना देशोधडीला लावू पाहतेय. वेळीच सावध व्हा, संघटित व्हा आणि संघर्षासाठी तयार रहा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांची भाषणे झाली. कामगार नेते होळीकर यांनी आपल्या प्रस्ताविकात कामगार बलिदान दिनाचे महत्व विषद करून सफाई कामगारांचा सत्कार करणे का आवश्यक आहे ते सांगितले तसेच कामगारांनी गटबाजी न करता एकमुठ संघटित राहिले पाहिजे तरच आपण आपले प्रश्न सोडवू शकतो. असे आवाहन केले. शेवटी प्रा. सुधीर अनवले यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन ॲड. दहिवाल यांनी केले.

# लातुरात भव्य प्रबोधन रॅलीने साहित्यरत्न अण्णाभाऊस अभिवादन






लातूर : लातूर येथील 'जी -२४ 'या सामाजिक संघटनेअंतर्गत स्थापन झालेल्या साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच राष्ट्रसेवा दल व इतर पुरोगामी परिवर्तनवादी संघटनाच्या वतीने आज १ ऑगस्ट रोजी सकाळी साडे आठ वाजता लातूर शहरातुन भव्य प्रबोधन रॅली काढण्यात आली. सदर रॅलीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रारंभ करण्यात आला. या रॅलीमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा आणि म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, जयघोष करण्यात आला. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिला पुरूषांच्या हातामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.परिवर्तनवादी जोशपूर्ण घोषणा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याला पुष्पाहार घालून ही रॅली महात्मा गांधी चौक मार्गे गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आणि त्यानंतर साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे चौक येथे पोहचली. या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. आले. सदर रॅलीमध्ये जिजाऊ ब्रिगेड, लसाकम, राष्ट्र सेवा दल, गुरु रविदास सत्यशोधक समाज, मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी संघटना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भटक्या विमुक्त संघटना, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना आदी संघटनाचा समावेश होता. तर प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य आर. डी. निटुरकर, प्रा. अनंत लांडगे, प्रा. सुधीर अनवले, जयंती समिती अध्यक्ष राजकुमार होळीकर, संयोजक नरसिंग घोडके, पांडुरंग देडे, यू डी गायकवाड, महानंदा शेवाळे, जयप्रकाश दगडे, डॉ. गणेश गोमारे, बी आर पाटील, प्रा. सुभाष भिंगे, कॉ. विश्वभर भोसले, ॲड. सोमेश्वर वाघमारे, अफजल कुरेशी, बरकत काझी, बी. बी. गायकवाड, आदी मान्यवर सहभागी होते

## भात खाल्ल्याने खरंच डायबेटिस होतो का?

तांदूळ खाऊन मधुमेह होतो हा एक सार्वत्रिक समज आहे.तो खरा आहे की खोटा, हे समजून घेऊ. मागील पिढ्यानपिढ्या शतकानुशतके तांदूळ हेच आपले मूळ धान्य आहे.त्यामुळे जे धान्य आपल्या जनुकांना हजारो वर्षांपासुन सात्म्य आहे, त्याचा आरोग्याला धोका होण्याची शक्यता कमीच. प्रश्न निर्माण झाला ,तो आपण आपल्या मातीत पिकलेला हातसडीचा तांदूळ सोडून भलतीकडेच पिकणारा रिफ़ाईन्ड तांदूळ खाऊ लागलो तेव्हा आणि त्या तांदळाच्या सेवनाला दिली जाणारी परिश्रमाची जोड थांबवली तेव्हा. तांदळाचा साखरेच्या चयापचयावर विपरित परिणाम होण्याची शक्यता का नाही, याचे वैज्ञानिक उत्तर समजून घेऊ.

तांदळाच्या कोंड्यामध्ये एक खनिज असते, त्याचे नाव क्रोमियम .या क्रोमियमची साखरेच्या चयापचयामध्ये गरज असते.१ इन्सुलिनच्या शरीरकोषांवरील कार्यामध्ये क्रोमियम साहाय्य करते व रक्तामधील साखर सम पातळीत ठेवण्यास मदत करते. त्याहुनही महत्त्वाचे म्हणजे तांदळामध्ये अत्याधिक प्रमाणात असलेले नायसिन अर्थात विटामिन बी३. कोंड्यासहित तांदळामध्ये २९.८एमजी इतक्या प्रचंड प्रमाणात नायसिन असते, २ जे इन्सुलिनचे कार्य सुरळीत होण्यासाठी, शरीरकोषांना साखर मिळण्यासाठी व रक्तामधील साखर सम पातळीत राहण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. साहजिकच तुम्ही कोंड्यासकट भात खाल्लात तर त्यामधील नायसिन तांदळामधील साखर शरीरकोषांना उर्जा म्हणून मिळण्यास मदत करेल व रक्तात साखर नियंत्रणात राहील. याचा अर्थ असा होतो की तुम्ही कोंड्यासहित तांदूळ खाणार असाल तर त्या तांदळामधील साखरेचा योग्य चयापचय होण्याची सोय निसर्गाने तांदळातच केलेली आहे.

# एलटीएनच्या चौथा वर्धापन दिनानिमित्त लातूर जिल्ह्यातील सर्पमित्रांना स्नेक रेस्क्यू किटचे वितरण







लातूर / प्रतिनिधी :- एलटीएनच्या चौथा वर्धापन दिनानिमित्त वर्धापन दिन विशेषांक व सर्प मित्रांना स्नेक रेस्क्यू किट चे दिनांक एक ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता डॉ अण्णाभाऊ साठे चौक गंजगोलाई लातूर येथे वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व गणेश चौधरी केंद्रीय अधिकारी अग्निशमन दल मनपा लातूर यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. सर्पमित्र शासनाच्या कोणत्याही मानधनाशिवाय अथवा कोणत्याही देणगीशिवाय साप पकडण्याचे जोखीमीचे काम करत असतात गेली अनेक वर्षापासून सर्प मित्रांच्या विविध मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत त्यावर शासन गांभीर्याने विचार करणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. ही बाब विचारात घेऊन सर्पमित्र विकास संघटन चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा एलटीएन चे संपादक नेताजी जाधव यांनी दुसऱ्या वर्धापन दिनी राज्यस्तरीय सर्पमित्र संमेलन व चौथ्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील ३० सर्पमित्रांना स्नेक रेस्क्यू किट चे वाटप करण्याचा संकल्प आज पूर्ण केला आहे. या कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, मोटार वाहन निरीक्षक सुरेश माळी प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर, वन परिमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे यांचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून धनंजय पोटे बोलताना सर्प मित्रांचे काम अतिशय कौतुकास्पद असून त्यांना फ्रंट लाईन वर्कर्स दर्जा मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी लागणारा पाठपुरावा आम्ही करत आहोत अशी ग्वाही दिली. सर्पमित्राने साप पकडण्याचे काम करत असताना काळजीपूर्वक करावे असा सल्लाही दिला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी रघुनाथ बनसोडे यांनी एलटीएनच्या कामाचा चढता आलेखाचे कौतुक केले. माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे, मोहन माने, लक्ष्मण कांबळे, मुख्याध्यापक कवी इस्माईल शेख, उषाताई आडे, लोकनायक संघटनेचे अध्यक्ष महादूभाऊ रसाळ, बंटी गायकवाड, ड राहुल कांबळे, भिमाशंकर गाढवे, सिद्धार्थ चव्हाण, अन्वर पटेल, नितिन लोखंडे, अजमेर शेख यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना एलटीएन न्युजचे संपादक नेताजी जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार सुशीलकुमार सुर्यवंशी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी किसन कदम, सर्फराज सय्यद, प्रीती माऊली लातूरकर, समाधान उदार, रवी सुळे, यांचे योगदान लाभले.

# लातूर येथील पत्रकार कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद सकारात्मक पत्रकारितेमुळे समाजाला योग्य दिशा – पोलीस अधीक्षक अमोल तांबे










लातूर :– सकारात्मक आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता ही सदृढ लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. सकारात्मक पत्रकारितेमुळे समाजाला योग्य दिशा मिळते आणि सामाजिक विकासाला गती प्राप्त होते, असे मत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केले. लातूर येथील डॉ. भालचंद्र रक्तपेढी सभागृहात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत लातूर विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यशाळेला प्रभारी विभागीय माहिती उपसंचालक विवेक खडसे, मराठी भाषा तज्ज्ञ प्रा. दीपक रंगारी, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे, विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांच्यासह जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. सदृढ लोकशाहीसाठी प्रसारमाध्यमे, शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे समाजाला मार्गदर्शन करतात.

नवमाध्यमे आणि समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता, सत्य आणि अचूक माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रसारमाध्यमांवर आहे. तसेच, नागरिकांना त्यांच्या कर्तव्यांबाबत जागरूक करण्याचे महत्त्वाचे कार्यही माध्यमांनी करणे आवश्यक आहे, असे पोलीस अधीक्षक श्री. तांबे यावेळी म्हणाले. पत्रकारांसाठी असलेल्या शासकीय योजना, सवलती आणि सुविधांबाबत माहिती मिळवून त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. प्रभारी विभागीय माहिती उपसंचालक विवेक खडसे यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना कार्यशाळा आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. पत्रकारांना शासकीय योजनांची माहिती देणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वृत्त संकलन–संपादन यांबाबत मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू होता, असे त्यांनी सांगितले.

f व f व ध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

मराठी भाषा तज्ज्ञ प्रा. दीपक रंगारी यांनी वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेचे नियम, शब्दांचा अर्थ, व्याकरणाचा योग्य वापर, तसेच मराठी भाषेच्या समृद्धीतील साहित्यिकांचे योगदान याविषयी त्यांनी माहिती दिली. क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व–दीर्घ उच्चार, तत्सम–तद्भव शब्दांचे नियम उदाहरणांसह समजावून सांगितले. पत्रकारांनी शब्दकोश आणि लेखनकोश यांचा वापर करून अचूक लेखन करावे, असे आवाहन त्यांनी केले. शब्दांचा वाक्यरचनेनुसार आणि संदर्भानुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केला. विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके यांनी पत्रकारांसाठीच्या अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी याविषयी सविस्तर माहिती दिली. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पत्रकारितेतील वापर, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती यांच्याशी संबंध, तसेच राष्ट्रीय आणि प्रादेशिक वृत्तपत्रांमधील सध्याच्या एआय ॲप्सच्या वापराबाबत माहिती दिली. या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले, विभागीय माहिती कार्यालयाच्या उपसंपादक रेखा पालवे–गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले

## यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता सन्मान व यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघ / संस्था कृतज्ञता सन्मान अर्ज करण्यासाठी जाहीर आवाहन .....

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने १ ऑक्टोबर या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक कृतज्ञता सन्मान व यशवंतराव चव्हाण ज्येष्ठ नागरिक संघ / संस्था कृतज्ञता सन्मान सुरू करण्यात आले आहेत. राज्यभरातून दिनांक १६ जुलै २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत सोबत दिलेल्या दोनही लिंक वरील अपेक्षित अर्ज डाऊनलोड करून खाली दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात यावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे. आपल्या कार्यकर्तृत्वातून सेवानिवृत्त झाल्यानंतर, आपल्या अनुभवाच्या जोरावर समाजाभिमुख कार्य करणारे अनेक ज्येष्ठ नागरिक आहेत, जे वैयक्तिक पातळीवर समाजोपयोगी कार्य करीत आहेत. तसेच सेवानिवृत्त झाल्यानंतर अनेक ज्येष्ठ नागरिक एकत्र येऊन ज्येष्ठ नागरिक संघ किंवा संस्था स्थापन करतात व लोकोपयोगी अनेक कार्य यशस्वीपणे पार पाडतात. असे ज्येष्ठ नागरिक व संघ किंवा संस्थेचा यथोचित सन्मान व्हावा हा या कृतज्ञता सन्मानाचा मुख्य उद्देश्य आहे. या सन्मानासाठी दोन महिला, दोन पुरुष, एक दिव्यांग व्यक्ती, एक तृतीयपंथी आणि एक संघ किंवा संस्था यांची निवड करण्यात येईल. या सन्मानाचे स्वरूप सन्मान चिन्ह, मानपत्र आणि सन्मानाची रक्कम असे राहील. हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्य सभागृह, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न होईल.

अर्ज डाउनलोड करण्यासाठी

ज्येष्ठ ना

गरिक वैयक्तिक :- https://chavancentre.org/.../yashwantrao-chavan-senior...

ज्येष्ठ नागरिक संघ किंवा संस्था: https://chavancentre.org/images/PDF/2š-pplication%20Formš2025šFinal.pdf

या लिंकवर क्लिक करावे. अधिक माहितीसाठी संपर्क – ०२२–२२०४५४६०, २२०२८५९८ विस्तारित २२४ (वार व वेळ: सोमवार ते शुक्रवार सकाळी ११:०० ते सायं ६:००) ईमेल: hdscchavancentre.org

## व्ही एस पँथर्स च्या वतीने लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



लातूर : व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक येथील पूर्ण आकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव शहर सचिव संजीव सुरवसे रवी कांबळे बबलू जोगदंड रोहित कांबळे सुमित पाटोळे अनिरुद्ध गायकवाड यशवंत सातपुते अविनाश कांबळे पदाधिकारी उपस्थित होते

## ज्येष्ठ नागरिक संघास बेंच भेट



लातूर :– लियनिर्स सर्विस ऑर्गनायझेशन ऑल इंडिया लांइयनेस क्लब लातूर तर्फे जेष्ठ नागरिक संघास जेष्ठाना बसण्याकरिता सिमेंट बेंच भेट देण्यात आला .या छोटेखाने कार्यक्रमाकरिता विचार पिठावर ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष डॉक्टर काशिनाथराव सलगर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तर प्रमुख अतिथी म्हणून माननीय सौ प्रतिभाताई शिवाजीराव कव्हेकर माजी प्रांत अध्यक्षा तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्षा व लि. साधना पळसकर प्रांताध्यक्ष या उपस्थित होत्या.बेंचच्या उद्घाटन प्रसंगी याच कार्यक्रमात ऑल इंडिया लिईनेस क्लबचा २६ जुलै वर्धापन दिन तो याच कार्यक्रमात केक कापून साजरा करण्यात आला.यावेळी मनोगतात सौ प्रतिभाताई कव्हेकर यांनी ही छोटीशी भेट ज्येष्ठानी स्वीकारावी भविष्यात आणखी ज्येष्ठाना काही हवं असल्यास ते सुद्धा देण्याचा प्रयत्न करू असे म्हणाल्या जेष्ठ नागरीक संघाच्या कार्याचे पदाधिकाऱ्याचे विशेषतः सचिव प्रकाश घादगिने यांचे त्यांनी खूपच कौतुक केले भविष्यात ज्येष्ठ नागरिक संघाबरोबर काम करायला आवडेल असे त्या म्हणाल्या यावेळी लि. साधना पळसकर प्रांताध्यक्ष व डॉक्टर काशिनाथराव सलगर यांनी लिईनेस क्लबचे कौतुक करून आभार व्यक्त केले या कार्यक्रमास क्लबच्या सदस्या सौ मंगल प्रभा विकास घाडगे, डॉक्टर उल्का देशमुख भिसे, लि.सौ कौसल्या जाधव ,सुवर्णा महाजन प्रांत सचिव ,ज्योती मंठाळे ,श्रद्धा श्री पाठक, मंदाकिनी जाधव ,संध्या जाधव, मंगल जाधव, जगदेवी वारद, श्रीमती कांदे अरुणा उपस्थित होत्या याच सोबत कार्यक्रमासाठी सतत संपर्क ठेवणारे माधव गीते हेही होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश घादगिने सचिव ज्येष्ठ नागरीक संघ यांनी केले तर आभार प्रकाश निला यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरता प्रकाश घादगिने , रमेश भोयरेकर ,शहाजी घाडगे ,डॉक्टर काशिनाथराव सलगर आदींनी प्रयत्न केले.

## चला राष्ट्र सेवादल समजून घेऊया अडव्होकेट अजय वाघाळे पाटील..






धाराशिव / प्रतिनिधी :– धाराशिव जिल्हा स्वातंत्र्यसैनिक संचलित धाराशिव प्रशाला धाराशिव व धाराशिव जिल्हा राष्ट्रसेवा दल यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्यापुण्यतिथी निमित्त चला राष्ट्र सेवा दल समजून घेऊया या कार्यकमास प्रमुख उपस्थिती राष्ट्रसेवा दलाचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर व त्यांचे सहकारी प्रमुख पाहुणे व माननीय बाबासाहेब जाधव जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक, सिदेश्वर बेलूरे,योग अभ्यासक, ऍड.अजय वाघाळे राष्ट्रसेवादल जिल्हा अध्यक्ष धाराशिव,जयश्री काकडे, सोरणा सोनवणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्यदयापक श्री जाधव पी एस स हे होते....चला राष्ट्र सेवादल समजून घेऊया या अभियानाची सुरुवात श्रराष्ट्रसेवा दलाचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर याच्या उदघाटनाणे करण्यात आली मुलांनमध्ये राष्ट्रप्रेम देश प्रेम, देशाबद्दल अभिमान बाळगण्याची प्रेरणा मिळावी या कर्यक्रमा मागचा उद्देश होय...हे अभियान सुरवातीला धाराशिव जिल्ह्यातील शाळा कॉलेज मध्ये राबवत असून हे अभियान पुढील काळात संपूर्ण महाराष्ट्र मध्ये राबवले जाण्याचे कांदळकर म्हणाले, सिदेश्वर बेलूरे यांनी मुलांना योग आणि प्राणायाम बदल माहिती देताना म्हणाले महर्षी पतंजली यांनी दिलेल्या अभ्यास द्वारे मन आणि शरीर तंदुरुस्त राहते असे बेलूरे,म्हणाले राष्ट्रसेवा दल धाराशिवचे जिल्हाध्यक्ष अडवोकेट अजय वाघाळे पाटील श्रम्हणाले देशाच्या स्वतंत्र लढ्यात राष्ट्रसेवादलाचे फार मोठे योगदान असून, स्वतंत्र पूर्व काळामध्ये अनेक आंदोलनामध्ये राष्ट्रसेवादल सौनिक हहारीने भाग घेत महात्मा गांधीजी यांची चलेजावची चळवळ असो किंवा हैदराबाद मुक्तिसंग्रामलढा,असो किंवा गोवा मुक्ती लढा. संयुक्त महाराष्ट्र ची चळवळ,आणीबाणीचा संघर्ष असो अलिकडचा नामांतरचा लढा. या सर्व लढ्यामध्ये राष्ट्रसेवा दलाचे सैनिक यांचे योगदान मोठे असून याची आठवणं नवीन पिढीला व्हावी म्हणून चला राष्ट्रसेवादल समजून घेऊया हे अभियान सुरु केल्याचे वाघाळे म्हणाले यावेळी प्रशालेचे शिक्षक मोहन सुरवसे यांनी विद्यार्थीना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रशालेचे मुख्याध्यापक श्री जाधव सरअध्यक्षीय समारोप करताना म्हणाले साने गुरुजीचा विचार खरा तो एकची धर्म मुलांनी अंगीकरला पाहिजे,शाम ची आई हे पुस्तक प्रत्यक मुलांनी वाचले पाहिजे असे जाधव सर म्हणाले,कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय वाघाळे पाटील यांनी केले कार्यक्रमाचे आभार मोहन सुरवसे यांनी मानले.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माळी सी एन यांनी केले..कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रणदिवे सर,गिरी सर, तस्लिम काझी, गुंडू पवार, कार्यक्रमात कर्मचारी विध्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते...

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळणी येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन

औसा: औसा तालुक्यातील तळणी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये लोकशाहीर साहित्यसम्राट डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या सुरुवातीला गावचे माजी सरपंच किरणात कांबळे उपसरपंच सत्यवान जाधव गावातील प्रतिष्ठित नागरिक शाहूराज प्रताळे शिक्षण प्रेमी संतोष कांबळे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि अभिवादन करण्यात आले यानंतर शाळेतील विद्यार्थी संध्या प्रताळे, अनुष्का कांबळे ,शिवम प्रताळे, हर्षद आडगळे, प्रसाद आडगळे ,उमेरा शेख ,अण्णांबीया पटवारी, असद पटवारी , महेश लंजारे या विद्यार्थ्यांनी लोकशाहीर आणाभाऊ साठे यांच्या बद्दलचे विचार व्यक्त केले तसेच शाळेतील शिक्षक रवी कुरील यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला . यानंतर गावातील शिक्षण प्रेमी नागरिक संतोष कांबळे यांच्या वतीने भाषण स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले .यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सत्यप्रकाश भोसले हरीश बोने रवि कुरील ,अनिल कांबळे, श्रीम रंजना हादवे, सोनाली गिरी मॅडम सह विद्यार्थी उपस्थित होते .



# दोन गुटखा माफिया लातूर जिल्ह्यातून हद्दपार. अवैध धंदे हद्दपार करण्यासाठी कडक कारवाईचे नूतन पोलीस अधीक्षकांचे निर्देश

लातूर :– दोन गुटखा माफिया लातूर जिल्ह्यातून हद्दपार. अवैध धंदे हद्दपार करण्यासाठी कडक कारवाईचे नूतन पोलीस अधीक्षकांचे निर्देश*

याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की,लातूर जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत वारंवार कारवाई करून सुद्धा अवैध धंदे सुरूच ठेवणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात येत असून पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीतील इसम

१) राजू उर्फ शिवलिंग हामने, राहणार भाग्यनगर तालुका अहमदपूर जिल्हा लातूर.

२) आकाश बालाजी कोटगीर, राहणार हाडोळती तालुका अहमदपूर जिल्हा लातूर

त्यांच्यावर मागील दोन वर्षाच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीक केलेला गुटखा, पानमसाला तसेच सुपारी ची विक्री व साठा करून त्याची अवैधरित्या किरकोळ व घाऊक विक्री करण्याचे अनेक गुन्हे दाखल असून वेळोवेळी प्रतिबंध व गुन्हे दाखल करून कारवाई करूनही त्यांच्या वर्तनामध्ये काहीच फरक पडत नाही. तसेच ते गुटखा व पानमसाला, सुपारीची लपून–छपून अवैध विक्री करीत असल्याने प्रतिबंधित गुटखा पान मसाला बाजारामध्ये उपलब्ध होत असल्याचे वारंवार आढळून येत असल्याने त्यांच्या अशा कृत्यामुळे युवा पिढी व्यसनाधीन बनत चालली आहे. गुटखा पान मसाला खाल्ल्यामुळे अनेक लोकांना वेगवेगळे आजार होवू शकतात. समाजातील लोकांवर, युवकांवर आरोग्य विषयक तसेच आर्थीक परिणाम होवून बेकारी वाढून समाजावर विपरीत परिणाम होत आहेत. तसेच दंडाधिकारी यांचेकडे प्रतिबंधक कार्यवाही करूनही त्याचे वर्तनामध्ये सुधारणा होत नसुन त्यांच्या या कृत्यामुळे सार्वजनीक आरोग्य व शांतता धोक्यात येत आहे.

त्यामुळे नमूद इसमांच्या वर्तनात सुधारणा होण्यासाठी तसेच शहरातील व परिसरातील लोकांचे स्वास्थ्य व सार्वजनिक शांतता कायम राहण्या करिता कलम ५६ (ब) म.पो.का.प्रमाणे एक वर्षाचे कालावधी करिता लातूर जिल्हयाचे हधीतून हद्यपार करणे आवश्यक असल्याने पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी नमूद इसमा विरुद्ध हद्दपारचे प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात आदेशित केले होते. त्यावरून अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बिराप्पा भुसनूर यांनी नमूद आरोपी विरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, अहमदपूर डॉ. मंजुषा लटपटे यांच्याकडे सविस्तर प्रस्ताव तयार करून हद्दपारिच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करून पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी, अहमदपूर अरविंद रायबोले यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे अहमदपूरचे पोलीस निरीक्षक बिराप्पा भुसनर व त्यांच्या टीमने नमूद आरोपी विरुद्ध सविस्तर हद्दपारचा प्रस्तावाचा पाठपुरावा करून उपविभागीय दंडाधिकारी अहमदपूर यांचे कार्यालयात सुनावणी अंति नमूद आरोपीना मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ५६ (ब) अन्वये नमूद आरोपींना लातूर जिल्हयातुन (एक) वर्षाकरीता हद्दपार करण्यात आले असून नमूद हद्दपार आरोपींनी दिनांक २२/०७/२०२५ ते दिनांक २२/०७/२०२६ पर्यंत लातूर जिल्ह्यात प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. सदरचे हद्दपारचे आदेश प्राप्त होताच अहमदपूर पोलिसांनी नमूद आरोपींना लातूर जिल्ह्याचे हद्दीबाहेर नेऊन सोडले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE